आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- देशाच्या अन्न उद्योगात नवोन्मेष, शाश्वतता आणि सुरक्षिततेचे जागतिक मानक प्रस्थापित करण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
- सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांचं मूल्यमापन त्यांच्याकडे येणार्या  निधीवरुन केलं जावं, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांचं मत
- अमेरिकी फेडरल रिझर्व्हनं व्याजदर कपातीची घोषणा केल्यानंतर सेन्सेक्स आणि निफ्टीचा विक्रमी पातळीला स्पर्श

**आणि**

- बांगलादेशाविरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताच्या पहिल्या दिवशी ६ बाद ३३९ धावा, आर आश्विनचं नाबाद शतक

**<><><><><>**

देशाच्या अन्न उद्योगात नवोन्मेष, शाश्वतता आणि सुरक्षिततेचे जागतिक मानक स्थापन करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित वर्ल्ड फूड इंडिया २०२४ परिषदेला आज पहिल्या दिवशी त्यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित केलं. प्रगतीशील कृषी पद्धती, भक्कम प्रशासकीय यंत्रणा आणि आधुनिक तंत्रज्ञान याद्वारे खाद्य प्रक्रिया क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी व्यापक सुधारणा सुरू केल्या असल्याचं ते म्हणाले. सरकार लघु उद्योगांना सक्षम बनवण्यावर सरकार भर देत असल्याचं त्यांनी सांगितलं. या परिषदेत अन्न सुरक्षा, गुणवत्ता मानकं यासारख्या मुद्द्यांवर तसंच

अन्न सुरक्षा वाढवणे, अन्नाची नासाडी कमी करणे यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

या चार दिवसीय परिषदेत ९० हून अधिक देश, २६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेश सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. ते वर्धा इथं पीएम विश्वकर्मा कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. यावेळी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि कर्ज वाटप करतील. या योजनेच्या एक वर्षाच्या यशस्वी पूर्ततेसाठी ते पोस्टाच्या तिकिटाचं अनावरणही करणार आहेत.

त्यानंतर ते अमरावती इथं पीएम मित्रा अर्थात पीएम मेगा इंटेग्रेटेड टेक्स्टाईल रिजन्स अँड ऍपरल पार्कची पायाभरणी करतील.

प्रधानमंत्री मोदी राज्य सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचं उद्घाटन करणार आहेत. त्यानंतर ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचंही अनावरण करतील.

**<><><><><>**

सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांचं मूल्यमापन त्यांच्याकडे येणार्या निधीवरुन केलं जावं, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज पुण्यात बँक ऑफ महाराष्ट्रच्या नव्वदाव्या स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. पायाभूत सुविधांसाठी निधी, औपचारिक बँकिंग सेवांमध्ये प्रवेश विस्तारणं, आणि सर्व नागरिकांसाठी सर्वसमावेशक विमा सुरक्षा सुनिश्चित करण्यावर त्यांनी भर दिला.

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका अटल पेन्शन योजना आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना यांसारख्या सरकारी विमा योजनांची अंमलबजावणी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

संस्कृती आणि नागरीकरणाची परंपरा अनेक शतकांपासून उज्जैनमध्ये अस्तित्वात होती, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. उज्जैनमध्ये आज सफाई मित्र संमेलनाला त्यांनी संबोधित केलं. उज्जैन - इंदूर ६ पदरी महामार्गाचं आभासी माध्यमातून त्यांनी भूमीपूजनही केलं. गेल्या १० वर्षात स्वच्छता अभियान राष्ट्रव्यापी झालं असून त्यातून देशात मोठे बदल दिसून आल्याचं त्या म्हणाल्या. मध्य प्रदेशातली अनेक शहरं सफाई मित्र सुरक्षित शहरं म्हणून जाहीर झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

इंदूरमधल्या देवी अहिल्या विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभालाही त्यांनी आज संबोधित केलं. मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्था आणि शिक्षकांनी प्रोत्साहन देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी महायुती शासनाकडून ३३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसंच, मुख्यमंत्री माझी सुरक्षित बहीण योजनाही सरकार आणणार आहे, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा इथं दिलं. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले....

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत आयोजित, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी सन्मान मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्याला

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते.

तत्पूर्वी बुलडाणा शहरात आज छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह बुलढाणा शहरात २६ स्मारकांचं लोकार्पण मुख्यमंत्री शिंदे यांनी केलं.

**<><><><><>**

अमेरिकी फेडरल रिझर्व्हनं व्याजदर कपातीची घोषणा केल्यानंतर आज देशातल्या शेअर बाजारातल्या दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी विक्रमी पातळीला स्पर्श केला. सेन्सेक्सनं आज सकाळच्या सत्रात ८३ हजार ७७४ आणि निफ्टीनं २५ हजार ६१२ या पातळीला स्पर्श केला. पण त्यानंतर दोन्ही शेअर बाजारात घसरण सुरू झाली. दिवसअखेर सेन्सेक्स २३७ अंकांची वाढ नोंदवून ८३ हजार १८५ अंकांवर बंद झाला. निफ्टीनं ३८ अंकांची वाढ नोंदवली आणि हा निर्देशांक २५ हजार ४१६ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेत आज चेन्नई इथं सुरु झालेल्या पहिल्या सामन्यात दिवसअखेर भारतानं ६ गडी गमावून ३३९ धावा केल्या. आर आश्विननं आज नाबाद शतक झळकावलं. बांगलादेशानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला होता.

मात्र भारताची सुरुवात खराब झाली. सलामीवीर यशस्वी जैसवालनं ५६ धावा केल्या. पण कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली प्रत्येकी ६ धावा करुन बाद झाले. तर शुभमन गिल शून्यावर बाद झाला. ऋषभ पंतनं ३९, तर के एल राहुलनं १६ धावा केल्या. भारताची स्थिती ६ बाद १४४ अशी झाली. मात्र त्यानंतर

रविंद्र जडेजा आणि आर अश्विन यांनी खेळपट्टीवर पाय रोवत डावसंख्येला आकार दिला. आजचा खेळ थांबला तेव्हा जडेजा ८६, तर आर अश्विन १०२ धावांवर खेळत होता.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीत आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या मुख्य सत्रात “सहकार से समृद्धि” या संकल्पनेअंतर्गत, आतापर्यंत वंचित असलेल्या खेड्यांमध्ये किंवा पंचायत समित्यांमध्ये दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था, प्राथमिक दुग्धव्यवसाय आणि मत्स्य सहकारी संस्थांचं गठन आणि बळकटीकरणावर मार्गदर्शिका जारी केली. तसंच “श्वेत क्रांती 2” आणि सहकारी संस्थांमधलं सहकार्य, यासाठीची मानक कार्यप्रणाली देखील सुरू केली.

<><><><><>

भारतानं २०३० पर्यंत ३०० मेट्रिक टन पोलाद क्षमता गाठण्याचं उद्दिष्ट ठेवलं असल्याचं केंद्रीय पोलाद आणि अवजड उद्योग मंत्री एच डी कुमारस्वामी यांनी म्हटलं आहे. पोलादातील हरितक्रांती आणि शाश्वत नवोन्मेषता या विषयावर मुंबईत आयोजित ३६ व्या राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते.

<><><><><>

हायड्रोजन इंधनाचा वापर करुन इंधन आयातीची प्रमाण २२ लाख कोटी रुपयांवरुन ४ लाख कोटी रुपयांपर्यंत कमी करण्याचा सरकारचा मानस असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आज म्हणाले. यासाठी केंद्र सरकार मिराई प्रकल्प राबवत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

शेतकऱ्यांचं कल्याण ही केंद्र सरकारची प्राथमिकता आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. केंद्र सरकारला शंभर दिवस पूर्ण झाल्याबद्दल ते वार्ताहरांशी बोलत होते. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत देशभरातल्या शेतकऱ्यांना २१ हजार कोटी रुपयांच्या मदतीचं वाटप करण्यात आलं, याचा लाभ ९ कोटी ५१ लाख शेतकऱ्यांना झाला असं चौहान म्हणाले.

**<><><><><>**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना धमकी दिल्याचा निषेध करण्यासाठी काँग्रेसने आज राज्यभरात आंदोलन केलं. मुंबईत मीरा भाईंदर इथं काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यांच्या उपस्थितीत आंदोलन करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आज लोणी बु. इथल्या प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाच्या १८ व्या पदवीदान समारंभाला उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रातल्या योगदानाबद्दल पद्मश्री सावजी ढोलकीया यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' या मानद उपाधीने सन्मानित करण्यात आलं.

राज्यपालांनी प्रवरा विशेषोपचार रुग्णालय आणि अवयव प्रत्यारोपण केंद्राचे ऑनलाईन पद्धतीनं भूमिपूजन केलं.

**<><><><><>**